शब्दांचा अवकाश



जयंत नारळीकर

jayant@iucaa.ernet.in

# केंब्रिज विद्यापीठ : अवघे ८०० वयमान!



किंग्ज कॉलेजमधली हिरवळ.

ऑक्सफर्ड-केंब्रिज या समकालीन विद्यापीठांत अनेक बाबतींत चढाओढ असणं स्वाभाविक आहे. मानव्यशास्त्र, राजकारण, कला आदी क्षेत्रांत ऑक्सफर्ड पुढं, तर वैज्ञानिक मोजताना केंब्रिज पुढं!

केंब्रिज विद्यापीठानं सन २००९ मध्ये ८०० वा वर्धापनदिन साजरा केला. एखाद्या संस्थेला दहा वर्षं पूर्ण झाली, की आपण दशकोत्तर समारंभ करतो. त्यापुढचे टप्पे म्हणजे २५, ५०, ६०, ७५ आणि जास्तीत जास्त १०० वर्षं ! या पार्श्वभूमीवर एखादं विद्यापीठ आठ शतकं पूर्ण करून जोमानं पुढं जात आहे, ही कल्पना अविश्वसनीय वाटते; पण दीर्घ परंपरा असलेल्या संस्था युरोपात आहेत, त्यांतलीच ऑक्सफर्ड आणि केंब्रिज ही दोन विद्यापीठं.

वास्तविक केंब्रिजपेक्षा ऑक्सफर्ड वयानं ज्येष्ठ. केंब्रिजच्या निर्मितीत ऑक्सफर्डला प्रमुख स्थान आहे. ऑक्सफर्ड शहरात आणि विद्यापीठात तेराव्या शतकाच्या सुरवातीला, 'इंग्लंडचा राजा आणि पोप यांच्यात सर्वोच्च कोण,' हा वाद निर्माण झाला. इंग्लंडमधला सर्वोच्च धर्ममार्तंड म्हणजे कँटरबरीचा आर्च बिशप. याची निवड करायचा अधिकार कुणाचा, राजाचा की पोपचा, हा वाद शाब्दिक मर्यादेत न राहता त्याचे पडसाद अल्पमतात असलेल्या पोपसमर्थकांना भोगावे लागले. हे समर्थक विद्यापीठातले होते व संभाव्य छळापासून आपलं रक्षण करण्यासाठी त्यांनी विरोधकांपासून पळ काढला. १२०९ मध्ये या शरणार्थी विद्वानांनी केंब्रिज या ग्रांटा नदीकाठी असलेल्या लहानग्या गावात नव्या विद्यापीठाची स्थापना केली. त्यानंतर परिस्थिती निवळली असावी. कारण १२३१ मध्ये तत्कालीन राजा हेन्री तृतीय यानं दोन्ही विद्यापीठांना सनदी दिल्या, ज्यां मुळे त्यांना कर भरावा लागत नसे. दोन वर्षांनी पोप ग्रेगरी --- यानं दोन्ही विद्यापीठांच्या स्नातकांना कुठंही शिकवण्याची परवानगी दिली; पण राजाची धार्मिक अधिकारांवरची मतं, धर्मगुरूंची धर्माबद्दल अपेक्षा आणि विद्यापीठाच्या शिक्षणातून ध्व नित तथ्यं यांच्यामध्ये परस्परविरोधाचे प्रकार होत राहिले. त्यांच्या नोंदी ठेवल्या गेल्या. अखेर इंग्लंडमध्ये यादवी युद्ध झालं. 'राजा चार्ल्स प्रथम'ला देहदंडाची शिक्षा देण्यात आली. क्रॉमवेलप्रणित लोकसत्ता आली; पण काही वर्षंच!

शेवटी पुन्हा राजाची (चार्ल्स द्वितीय) प्रतिस्थापना झाली. अशा या विद्यापीठात धर्म, तत्त्वज्ञान, भाषा आदींचं अध्ययन व अध्यापन होत असलं, तरी १७ व्या शतकात आयझॅक न्यूटनच्या शोधकार्यातून विज्ञानाची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्या विषयाला 'नैसर्गिक तत्त्वज्ञान' हे नाव देण्यात आलं. न्यूटनपासून आधुनिक काळापर्यंत केंब्रिज विद्यापीठानं आपलं विज्ञानातलं वर्चस्व टिकवलं आहे. इथं शिकून तयार झालेल्या किंवा इथं शिकवणाऱ्या अशा वैज्ञानिकांची नामावली अनन्यसाधारण आहे.

ऑक्सफर्ड-केंब्रिज या समकालीन विद्यापीठांत अनेक बाबतींत चढाओढ असणं स्वाभाविक आहे. मानव्यशास्त्र, राजकारण, कला आदी क्षेत्रांत ऑक्सफर्ड पुढं, तर वैज्ञानिक मोजताना केंब्रिज पुढं. युनायटेड किंग्डमचे जास्तीत जास्त पंतप्रधान ऑक्सफर्डमध्ये शिकलेले. ख्रिस्टफर वूड या लेखकानं राजकारणी आणि वैज्ञानिक यांच्यातला फरक पुढच्या वाक्यात बरोबर टिपला आहे : "ऑक्सफर्डमध्ये शिकलेला अशा आविर्भावात रस्त्यावरून जातो, जणू काही तो रस्ता त्याच्या मालकीचा आहे; त्याउलट केंब्रिजमध्ये शिकलेला अशा तऱ्हेनं चालतो, की त्याला, हा रस्ता कुणाचा, याची पर्वा नाही." विद्यापीठातल्या प्राध्यापकमंडळींत चढाओढ, हेवे-दावे असतात. केंब्रिज त्याला अपवाद नाही. एका शतकापूर्वी भौतिकशास्त्राचे महारथी रदरफर्ड आणि खगोलविज्ञानाचे अध्वर्यू एडिंग्टन यांचे परस्परसंबंध सरळ नव्हते. त्यांचा एक किस्सा असा : रदरफर्डची कॅव्हेंडिश प्रयोगशाळा आणि एडिंग्टनचं आर्टस स्कूल हे शेजारी शेजारी होते. एकदा कामावर जाताना दोघे कॅव्हेंडिशसमोर भेटले, तेव्हा रदरफर्डनं विचारलं : "प्रोफेसर एडिंग्टन, आपल्या मते विश्वाचं वय काय असेल?"

एडिंग्टननं ठसक्यात सांगितलं : "प्रोफेसर रदरफर्ड, विश्वाचं वय २००० मिलियन (२०० कोटी) वर्षं इतकं असावं. ही संख्या इतकी मोठी असण्याचं कारण, विश्वाचं वय विश्वातल्या कुठल्याही वस्तूपेक्षा जास्त असणं आवश्यक आहे." त्यावर रदरफर्डनं खिशातून एक दगड काढून दाखवला आणि म्हटलं : "मी नुकतंच अणुगर्भीय पद्धतीनं या धोंड्याचं वय निश्चित केलंय, ते आहे ३००० मिलियन वर्षं!"

मी केंब्रिजमध्ये गणितासाठी अंडरग्रॅज्युएट म्हणून प्रवेश घेतला, ते वर्ष होतं १९५७. त्या वेळी तिथल्या विविध गणित शाखांवर लेक्चर्सना हजेरी लावताना जाणवे, की केवळ शिक्षकाच्या नोट्सवर भागण्यासारखं नाही.

भारतात शिक्षकानं आरामात चमच्यानं विषय भरवलेला असतो. परीक्षेत संभाव्य असे प्रश्न सोडवून दिलेले असतात. तिथं वर्षभरात जेवढं शिकवतात, तेवढं केंब्रिजमध्ये २४ लेक्चर्समध्ये शिकवलं जातं. त्यामुळे भारतात परीक्षा गाजवलेल्यांची इथं लवकर विकेट पडलेली पाहिली. कारण, 'आपण 'तिथं' उत्तम केलं, तर इथं का नाही?' अशा भावनेत राहून ते योग्य वेळी सावध झाले नाहीत. जे वेळीच सावध झाले, त्यांनी कॉलेजच्या ट्युटोरियल सुपरव्हिजनचा फायदा घेतला. प्रत्येक विद्यार्थी एका शिक्षकाला आठवड्यातून एक तास भेटतो. त्या तासाचा फायदा प्रश्न सोडवण्यासाठी किंवा लेक्चरमध्ये न समजलेला भाग समजून घेण्यासाठी अथवा केवळ चर्चेसाठी घेणारे लेक्चरच्या एक्स्प्रेस ट्रेनमधून सुखरूप प्रवास करू शकतात.

एकंदर, कुठल्याही विषयात 'गुणवत्ता' हा एकमेव निकष या विद्यापीठात मानला जातो; म्हणूनच १९०४ पासून आजवर विद्यापीठाशी संबंध असलेले (तिथं शिकलेले, शिकवणारे किंवा संशोधन करणारे) हिशेबात घेतले, तर त्यांत नोबेल पारितोषिकाचे ८९ मानकरी सापडतील!

शैक्षणिक गुणवत्तेप्रमाणेच जुन्या इमारतींची निगा राखणं व त्यांच्या भोवतालच्या हिरवळी जोपासणं यासाठीही केंब्रिज-ऑक्सफर्डपासून शिकण्यासारखं आहे. हा एक किस्सा पाहा : कॉलेज-पोर्टरला गाठून एक टूरिस्ट म्हणाला : "ही हिरवळ तुम्ही कशी तयार करता, जोपासता?" पोर्टरनं पुरवलेली माहिती ऐकून तो म्हणाला : "या गोष्टी आम्हीपण करतो; पण आमची हिरवळ इतकी उत्कृष्ट होत नाही." त्यावर पोर्टर उद्गारला : "धीर धरा! आमच्या या हिरवळी २०० वर्षं मशागत केल्यानंतर अशा झाल्या आहेत!"

## रामबाण

श्रीराम ग. पचिंद्रे

अध्यक्ष
कुंडलीतला
'दुःशमग्रह'
वक्री झाला,
तरी धाब्रेसाठी
पळत आहेत...
दांडी
उडून पडली
तरी
रडीचा डाव
खेळत आहेत...